**राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत Establishment of Center of Excellance for Genetic Improvement at Krishi Vigyan Kendra, Baramati, Dist. Pune या प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्र. राकृवि-२०१७/प्र.क्र.५१/पदुम-४,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.**
**दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७.**

वाचा :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत दि. २५.५.२०१७ रोजी पार पडलेली राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची सभा.

**प्रस्तावना :-**

दिनांक २५ मे, २०१७ रोजी राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या पार पडलेल्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या सभेमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत Establishment of Center of Excellance for Genetic Improvment at Krishi Vigyan Kendra, Baramati, Dist. Pune या प्रकल्पास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने, खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत Establishment of Center of Excellance for Genetic Improvment at Krishi Vigyan Kendra, Baramati, Dist. Pune या प्रकल्प प्रस्तावास याद्वारे शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, या प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. ८६९.४३ लक्ष अपेक्षित असून, यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रु. ३५३.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच , उर्वरीत रु. ५१६.४३

लक्ष हा कृषि विज्ञान केंद्र, बारामती, जि. पुणे या संस्थेचा हिस्सा राहणार आहे. सदरचा प्रकल्प राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अधीन राहून राबविण्यात यावा.

**प्रकल्पाची उद्दिष्टये:-** या प्रकल्पाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) नाविन्यपूर्ण पशुसंगोपन विषयक प्रात्याक्षिके आयोजित करणे.
२) अत्याधुनिक तंत्रज्ञान विषयक प्रात्याक्षिके प्रकल्प निर्माण करणे.
३) कृत्रिम रेतनासाठी शास्त्रोक्त कार्यप्रणाली विकसित करणे.
४) संपूर्ण आहार प्रणालीच्या माध्यमातून गाईं व म्हशींसाठी आहार व्यवस्थापन तयार करणे व त्यासाठी TMR (Total Mixed Ration) तंत्रज्ञानाचा वापर करणे.

५) संकरित गायींसाठी उष्ण कटिबंध प्रदेशासाठी गोठा बांधणीप्रकल्प उभा करणे, देशी गाई व म्हशींसाठी आदर्श गोठा निर्माण करणे.

६) आधुनिक पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय संदर्भाने शेतकऱ्यांना प्रशिक्षण आयोजित करणे

७) शेतकऱ्यांसाठी प्रात्याक्षिक रोगनिदान सुविधा व विस्तार पुरविणे तसेच मोबाईल ॲप मार्फत नविन संशोधन विकासक माहिती देणे.

**प्रकल्पाचे आर्थिक निकष :-**

सदर प्रकल्पांतर्गत विविध खर्चाच्या बाबी व त्यासाठी अपेक्षित एकूण खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

**रु. लाखात)**

| **अ.क्र.** | **खर्चाची बाब** | **अपेक्षित खर्च** | **राकृवियो हिस्सा** |
|---|---|---|---|
| १ | ५० देशी गाई व ५० म्हशींचे (पंढरपूरी किंवा जाफराबादी) संगोपन व आदर्श गोठा उभा करणे | ३२९.६४ | ७७.३२ |
| २ | Molecular Genetics प्रयोगशाळा उभारणी करणे. | ३०७.६८ | २०१.४७ |
| ३ | खाद्य, पाणी व चारा तपासणी प्रयोगशाळेची उभारणी करणे. | १९०.५१ | ४७.६१ |
| ४ | शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षणांचे आयोजन करणे. | २१.६० | २१.६० |
| ५ | अत्याधुनिक तंत्रज्ञान, माहिती प्रसारित करण्यासाठी ॲप विकसित करणे. | २०.०० | ५.०० |
| | **एकूण** | **८६९.४३** | **३५३.००** |

जिल्हा स्तरावर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, पुणे हे या प्रकल्पाचे अंमलबजावणी अधिकारी राहतील. सदर प्रकल्पाचे संनियंत्रण विभागीय स्तरावर प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग व राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे करतील. सदरच्या प्रकल्पास आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तांत्रिक मंजूरी प्रदान करावी. सदर प्रकल्पाचा कालावधी दोन वर्षाकरिता राहील. सदर प्रकल्प राबविण्याकरिता मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प विहीत कालावधीत पूर्ण करण्याबाबतचे विहीत नमुन्यातील बंधपत्र व कामांचा आराखडा आयुक्त पशुसंवर्धन याना सादर करणे बंधनकारक आहे. आयुक्त पशुसंवर्धन यांनी उपरोक्त संस्थेकडून विधीग्राह्य बंधपत्र लिहून घ्यावे व ते शासनास सादर करावे.

**अटी व शर्ती :-**

१. मंजूर करण्यात आलेला निधी हा उपरोक्त तक्त्यात नमूद बाबींसाठी प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट मंजूर घटकांकरिता संस्थेने खर्ची घालावा.

२. मंजूर प्रकल्प किंमतीपेक्षा प्रकल्पावर होणारा अधिकचा खर्च संस्था स्वत: सोसेल वाढीव प्रकल्पावर होणा-या खर्चासाठी शासन जबाबदार राहणार नाही. तसेच त्याकरीता शासनामार्फत मंजूर प्रकल्प किंमती व्यतिरिक्त निधी मंजूर करण्यात येणार नाही.

३. मंजूर करण्यात आलेल्या निधीबाबत झालेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे जी.एफ.आर.नियम क्रमांक १४९ अन्वये विहित केलेल्या पध्दतीप्रमाणे ठेवावेत व झालेल्या खर्चाचा अहवाल आणि लेख्यांच्या संदर्भात झालेले लेखापरिक्षण या संबंधीची माहिती आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करण्यात यावी.

४. संस्थेला मंजूर निधीमधून प्राप्त झालेली मिळकतीचे (स्थावर / निमस्थावर) अशा सर्व मिळकतीचे लेखे लेखापरिक्षणास आश्यकतेप्रमाणे उपलब्ध करून द्यावेत.

५. संस्थेला मंजूर करण्यात आलेल्या निधीमधून झालेल्या मिळकतीतील वाढीची विल्हेवाट लावण्यापूर्वी शासनाची मान्यता घेणे संस्थेस बंधनकारक राहील.

६. संस्थेला उपलब्ध करून दिलेल्या निधी उपयोगिता प्रमाणपत्र संस्थेने आयुक्त पशुसंवर्धन यांचेमार्फत शासनास सादर करावे. वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज उर्वरित निधी वितरीत केला जाणार नाही. तसेच वितरीत निधी विहित कालावधीत खर्च न केल्यास प्रकल्प कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. मंजूर प्रकल्पाची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसवर्धन उपायुक्त, पुणे यांची राहील. तसेच प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन, पुणे व राज्यस्तरावर आयुक्त पशुसंवर्धन हे संनियंत्रण अधिकारी म्हणून राहतील.

८. शासन निधी वितरीत होईल त्या प्रमाणात संस्था आपला हिस्सा गुंतविल. सदर प्रकल्प राबविणे सोयीचे व्हावे त्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पुणे व प्रकल्प प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांचे संयुक्त खाते बँकेत उघडण्यात यावे. या संयुक्त खात्यामध्ये संस्थेच्या हिश्याची रक्कम ज्या प्रमाणात उपलब्ध होईल त्याच प्रमाणात या योजनेअंतर्गत मंजूर असलेली तरतूद संबंधित संस्थेला अदा करण्यात येईल. प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन, पुणे सदर रक्कम वितरीत करण्यापूर्वी योजनेसाठी संनियंत्रण अधिकारी असल्यामुळे त्यांची मान्यता प्राप्त करून घेतल्यानंतरच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पुणे यांनी रक्कम बँकेतून आहरीत करून संबंधित संस्थेला वितरीत करावी.

९. या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीचा विनियोग योग्यरीत्या न झाल्यास ती शासकीय नियमानुसार व बंधपत्रातील अटी व तरतूदीनुसार व्याजासहीत संबंधित संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

१०. सदर योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारे सर्व साहीत्य व उभारण्यात येणा-या प्रकल्पासाठी संस्थेने शासन कार्यपध्दतीप्रमाणे निविदा प्रक्रीयेचा अवलंब करावा.

११. या योजनेअंतर्गत बसविण्यात येणा-या साहित्यांवर तसेच योजनेअंतर्गत उभारण्यात येणा-या प्रकल्पावर हा प्रकल्प "राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत" असे ठळकपणे दर्शनी भागावर नमूद करणे आवश्यक राहील.

हा प्रकल्प राबवून झाल्यानंतर आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकल्पाची फलनिष्पत्ती त्यांच्या अभिप्रायासह शासनास सादर करावी.

सदरचा प्रकल्प राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णय व राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सुचना तसेच, केंद्र शासनाने राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या अंमलबजावणीकरीता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन राबविण्यात यावा.

या प्रकल्पाचा समावेश संबधित जिल्हयाच्या जिल्हा कृषि आराखडयात (C-DAP) करण्यात येवून तसे, राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष यांना तसेच, या कार्यासनास कळविण्यात यावे.

केंद्र शासनाने विकसित केलेल्या RDMIS या प्रणालीवर या प्रकल्पाची माहिती भरण्यात यावी. तसेच, प्रकल्पाच्या आर्थिक खर्चाचा आणि भौतिक साध्याचा मासिक प्रगती अहवाल नियमितपणे शासनास सादर करावा.

प्रकल्प राबविताना त्याची अंमलबजावणी, सनियंत्रण आणि मुल्यमापन करणे याबाबत आवश्यक तो समन्वय अंमलबजावणी यंत्रणांनी आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी ठेवावा.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या स्तरावरुन तात्काळ निर्गमित कराव्यात.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७०९१३१११८०६०३०१ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2017.09.13 11:09:27 +05'30'

**(रविंद्र गुरव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. अपर मुख्य सचिव, (कृषि व पणन), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७
३. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
४. उपसचिव (राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), मुंबई/नागपूर.
६. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व)
७. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, पुणे
८. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
९. कृषि विज्ञान केंद्र, मालेगांव, ता. बारामती, जि. पुणे
१०.निवड नस्ती पदुम-४.